मागणी क्र. झेडएच-३ - पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम प्रसिध्दी व पारितोषिक योजना (कार्यक्रम), जाहिरात व प्रसिध्दी

<u>लेखाशिर्ष २४०२ ए१९३</u>

सन २०१९-२० मधील अर्थसंकल्पीत निधीतून प्रजासत्ताक दिनानिमित्त चित्ररथ तयार करण्यासाठी झालेल्या खर्चाचे देयक अदा करण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**मृद व जलसंधारण विभाग**

**शासन निर्णय क्र. पाविच-२०१९/प्र. क्र.७६/जल-८**

हुतात्मा राजगुरू चौक, मादामा कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०३ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :

१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.जलसं २००८/प्र.क्र.३१/जल-८, दिनांक २५ ऑगस्ट, २००८

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८ जुलै, २०१९

३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, कार्यालयीन आदेश क्र.वृत्तचित्र -१९/चित्ररथ जा. उभारणीबाबत/का-७/१२५९, दिनांक १६ जानेवारी, २०१९

<u>प्रस्तावना</u> :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंधारणाच्या कामास फार मोठे महत्व आहे. दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयानुसार राज्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान राबविण्यास सुरुवात झाली असून सन २०१९-२० मध्ये ५००० गावे पाणी टंचाई मुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. तर दरवर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी लोकसहभाग अत्यंत महत्वाचा असून त्यासाठी प्रचार व प्रसिध्दी करणे व अभियानात लोकसहभाग वाढविण्यासाठी विविध माध्यमांद्वारे प्रचार-प्रसिध्दी करणे अत्यंत आवश्यक आहे.

२. संदर्भिय शासन निर्णय दिनांक २५/८/२००८ नुसार मृद व जलसंवर्धनाचे उद्दिष्ट व महत्व सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत दिनांक २६ जानेवारी, २०१९ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संचलनामध्ये नियोजन (रोहयो) विभाग आणि मृद व जलसंधारण विभागाच्या योजनांवर आधारित संयुक्तिक चित्ररथाचा समावेश करण्यात आला होता. सदर चित्ररथाद्वारे मृद व जलसंधारणाच्या महत्वाच्या योजनेची प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली असून, त्यासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संचालनातील चित्ररथाच्या कामाकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी जाहिरात संस्थेस कार्यालयीन आदेश दिला होता. त्यानुषंगाने मे. प्रसिध्दी ॲडर्व्हटायझिंग प्रा. लि., पुणे या जाहिरात संस्थेने मृद व जलसंधारण विभागाच्या चित्ररथाचे रु. ७,५०,०००/-इतक्या खर्चाचे देयक सादर केलेले आहे. सदर देयकाची रु. ७,५०,०००/- (रुपये सात लाख पन्नास हजार फक्त) ) इतकी रक्कम सदर संस्थेस अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर बाबीवर खर्च करताना, जाहिरात व प्रसिध्दीबाबत शासनाचे प्रचलित आदेश तसेच माहिती व जनसंपर्क संचालनालयाने दिलेल्या सूचना यांचे काटकोरपणे पालन करण्यात यावे.

३. सदर निधी कोषागारातून आहरण व संवितरण करिता **“सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे”**. सदर निधी खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१९-२० च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**"मागणी क्रमांक झेएच-३,**
**२४०२- मृद व जलसंधारण महसूली लेख्यावरील खर्च**
**१०२ - मृदसंधारण -**
**(०१) मृद व जलसंधारण**
**(०१) (०१) पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, प्रसिध्दी व पारितोषिक योजना (कार्यक्रम)**
**२६, जाहिरात व प्रसिध्दी (२४०२ ए१९३)**

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र. २ वरील दि.०८.०७.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील अटी व शर्तीची पूर्तता करण्यात येईल, याची देखील दक्षता घ्यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०३११४१५११९२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravi Shivaji Vhatkar

Digitally signed by Ravi Shivaji Vhatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Soil and Water Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bca9a9d38f4447074d53ffd7129d6c978023dfe76311c98a4ffd7de9447d9bb9, serialNumber=85ad116139ecb1182dd7fbef85e39485778bb2d61f5a53c998ffd46129875c23, cn=Ravi Shivaji Vhatkar
Date: 2019.08.03 15:42:02 +05'30'

**( र. शि. व्हटकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,

३. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई,
४. सर्व सन्माननिय संसद सदस्य व विधानसभा / विधानपरिषद सदस्य,
५. मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
६. मा. राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. विभागीय कृषि सहसंचालक, पुणे,
१०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
११. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
१२. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१४. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१५. मे. प्रसिध्दी ॲडर्व्हटायझिंग प्रा. लि., पुणे-५,
१६. नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१७. कक्ष अधिकारी/ जल-११, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. कार्यासन/जल-८ (निवड नस्ती).